**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,**

**पत्ता : ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी पोलीस कॅम्प, वरळी, मुंबई–४०० ०३०.**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम १९(१) अन्वये.**

**प्र.अ.अ. अपील क्रमांक २०/२०२३.**

**जा.क्र ४१ /अपोउआ/लाप्रवि/बृमुंवि/मा.अ.अ. २०/२०२३** दिनांक :– २८/०३/२०२३

श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय ,
रा. बी –१ , वैशाली अपार्टमेंट,
एमटीएनएल एक्सचेंज समोर , शेठ मोतीशा ( लव ) लेन ,
माझगांव , मुंबई १० .....अपीलार्थी

विरुध्द

शासकिय माहिती अधिकारी ......प्रतिवादी
तथा सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.

**प्रथम अपील अर्ज सुनावणी दिनांक १६/०३/२०२३**
अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

| मुळ अर्जाचा दिनांक | जनमाहिती अधिका–याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २४/०१/२०२३ | २०/०३/२०२३ | २८/०२/२०२३ |

अपीलार्थी श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय , यांनी दिनांक २४/०१/२०२३ रोजी शासकिय माहिती अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज सादर करुन माहिती मागितली होती. त्यांच्या अर्जावर शासकिय माहिती अधिकारी यांनी जा.क्र. १८२/लाप्रवि/बृमुंवि/माअ/३०/२०२३ दि. २०/०३/२०२३ अन्वये उत्तर दिलेले आहे. सदर माहिती अधिकार पत्रान्वये पुरविलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि २८/०२/२०२३ रोजी केलेला अपील अर्ज या कार्यालयास दि. ०३/०३/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अपीलाची सुनावणी दि १६/०३/२०२३ रोजी १२.३० वा. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कक्षात होणार असल्याबाबत कार्यालय जा.क्र. ६६/अपोउआ/लाप्रवि/मुंवि/माअप्रअ–२०/२०२३, दि. ०८/०३/२०२३ अन्वये अपीलार्थी यांना आगाऊ कळविण्यात आले होते. सदर अपील सुनावणीस अपीलार्थी उपस्थित होते. लाप्रवि मुंबई विभागाच्या वतीने प्रतिवादी श्री. संजय पाटील , सहाय्यक पोलीस आयुक्त तथा शासकीय माहिती अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई हे समक्ष हजर होते.

## आदेश

अपीलार्थी श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय , हे (अपील क्र. २०/२०२३) अपील सुनावणीस उपस्थित होते.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहितीचे उत्तर देण्यात आलेले आहे.

अपीलार्थी श्री. कमलाकर शेणॉय व जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये मांडलेले मुद्दे, केलेला खुलासा यांचे अवलोकन केले असता ( अपील क्र. २०/२०२३ ) अपीलार्थी यांनी अपील करण्याचे कारण असे नमुद केले आहे की, त्यांना अपेक्षित माहिती ही मुदतीमध्ये त्यांना देण्यात आलेली नाही. माहिती अधिकार कायदयान्वये कलम ८ व ९ व्यतिरिक्त कोणतीही माहिती जनमाहिती अधिकाऱ्यांना नाकारता येणार नाही. तसेच माहिती नाकारण्याची कोणतीही कारणमिमांसा जनमाहिती अधिकारी यांनी केलेली नाही. अशाप्रकारे माहिती जाणुनबुजुन नाकारल्याने जनमाहिती अधिकारी यांनी भादवि १६६, १६७ अन्वये गुन्हा केलेला आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी माहिती नाकारतांना ती माहिती विधानसभेस किंवा संसदेस नाकारु शकतो असे नमुद केलेले नाही. तसेच त्यांनी असेही नमुद केले आहे की, प्रथमअपिल अधिकारी किंवा राज्य माहिती आयोग यांनी अपील सुनावणी घेण्यापुर्वी अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्यांनी देण्याचे निर्देश दयावे. यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे उत्तर दिले की, अपिलार्थी यांनी केलेला माहिती अधिकार अर्ज हा मा. महासंचालक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे प्राप्त झाला होता. तो मुंबई विभागाशी संबधित असल्याने त्यांनी तो अर्ज दि २४/०२/२०२३ रोजी जनमाहिती अधिकारी, मुंबई विभाग यांचेकडे पाठविला. तसेच तो अर्ज मा. महासंचालक कार्यालयातील जनमाहिती अधिकाऱ्यास दि २४/०२/२०२३ रोजी प्राप्त झाल्याचे त्या पत्रावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती ही जाणुनबुजुन नाकारली असे म्हणणे योग्य नसुन ती माहिती संकलित करण्याचे काम सरु असुन ते ती माहिती अपिलार्थी यांना २ ते ४ दिवसात देण्यात येईल. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे अपिलार्थी यांनी मान्य केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या अपिल अर्जात असे नमुद केले आहे की, प्रथम अपील अधिकारी यांनी अपील सुनावणी उघडया दालनामध्ये व पारदर्शीपणे घेण्यात यावी. अपीलार्थी हे ६५ वर्षाचे वरिष्ठ नागरीक असुन त्यांची सुनावणी निपक्षपातीपणे व पारदर्शीपणे होण्यासाठी सदर सुनावणीची व्हिडीओ रेकांर्डीग करण्याची त्यांना मुभा देण्यात यावी. त्याप्रमाणे त्यांना सदर सुनावणीच्या वेळेस मुभा देण्यात आलेली आहे.

त्यामुळे वर नमुद अपीलार्थी यांच्या प्रत्येक मुदद्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सुस्पष्टपणे स्पष्टीकरण दिलेले असुन ते योग्य आहे. अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्यांना वर नमुद मुदतीत देण्यात यावी असे जनमाहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले. सबब सदरचा माहीती अधिकार अर्जाचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

उपरोक्त अपीलाबाबत दिलेल्या निर्णयामुळे अपिलार्थी व्यथित झाल्यास, सदर निर्णयाची प्रत प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांचे आत मा. राज्य माहिती आयुक्त, नवीन प्रशासकीय भवन, १३ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई – ४०० ०३२ यांचेकडे अपील दाखल करता येईल.

२७/३/२३

( हेमंत सावंत )
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई